# श्री गुरुदेव रानडे

## निंबरगी स्वरूप सांप्रदायाचा

# दीपस्तंभ



गुरुदेव रानडे मंदिर, बेळगांव

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्षसि । भ. गी. १८-५८

श्री गुरुदेव रा. द. रानडे



जन्म : जमखंडी
३ जुलै १८८६
(आषाढ शु. २, शके १८०८)

महानिर्याण : निंबाळ
६ जून १९५७
(जेष्ठ शु. १०, शके १८७९)

# प्रकाशकाचे दोन शब्द

श्री गुरुदेवांचा जन्म ३ जुलै १८८६ रोजी झाला. यंदा जन्म-शताब्दीचे वर्ष म्हणून साजरे करणेचे ठरले. त्यानिमित्त श्री गुरुदेवांचे विषयी एक लहानशी पुस्तिका तारीख ३ जुलै १९८६ रोजी प्रसिद्ध करावी असा विचार ठरला आणि आमचे ट्रस्ट बोर्डाने तसा आदेश दिला. डॉ. कृष्णानंद गोगटे, मिरज यांचेकडून काही लिखाण आले होते; पण ते अपुरे होते. म्हणून श्री वसंतराव देशपांडे याना एक लहानशी पुस्तिका तयार करणेस सांगितले. त्यांनी हे कार्य हाती घेवून वेळवर पूर्ण करुन दिले. डॉ. गोगटे व श्री देशपांडे यांचे आम्ही आभारी आहोत.

विक्रांत प्रेसने ही पुस्तिका तत्परतेने छापून दिली आणि छपाई चांगली केली त्याबद्दलही आम्ही मालकांचे आभारी आहोत.

ही पुस्तिका वाचलेवर श्री गुरुदेवांचे भव्योदात्त व्यक्तिमत्व दिसून येईल आणि या शतकातील एका थोर साक्षात्कारी संताचे दर्शन घडेल अशी खात्री आहे.

प्रकाशक : श्री दिगंबर परुळेकर
गुरुदेव रानडे मंदिर, हिंदवाडी–बेळगांव.

O

प्रति : १००० ३ जुलै १९८६

O

किंमत : १–०० रु.

O

छपाई : विक्रांत प्रिंटर्स,
हिंदवाडी – बेळगांव

# श्री गुरुदेव रानडे

गुरुदेव रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचा जन्म ३ जुलै १८८६ रोजी जमखंडी एथे झाला. त्यांच्या मातुःश्रीनी सोळा सोमवारचे कडक वृत आचरले; मनांत पुत्रप्राप्तीची इच्छा दृढ केली आणि त्याचे फळ म्हणूनच की काय त्यांच्या पोटी रामभाऊचा जन्म झाला. लहानपणापासून प्रकृती अशक्तच. पण मनाचा खंबीरपणा आणि तीव्र बुद्धीमत्ता यांच्या जोरावर त्यानी साक्षात्कारापर्यंत मजल मारली. तारुण्यांत पदार्पण करण्या-पूर्वीच त्याना श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्याकडून अनुग्रह मिळाला. ते मॅट्रिकमध्ये असताना त्यानी मनांत संकल्प केला की या अनुग्रहाचे सामर्थ्य खरे असेल तर आपणाला जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळावी. त्यानी अभ्यासही झटून केला. आणि तितक्याच निष्ठेने गुरुनी दिलेल्या नामाचा जपही केला. आणि त्याना जेव्हां खरोखरच स्कॉलरशिप मिळाली तेव्हां आपल्या गुरुवर त्यांची निष्ठा पक्की झाली. ती दिवसें दिवस वाढत गेली आणि लवकरच ते स्वतः गुरुपदाला पोचले. पूर्वजन्माच्या सुकृतामुळे असो अगर गुरुकृपेने असो, ते स्वतः ज्ञानीच होते. तेव्हां शाळा कॉलेज मधून विद्यादान करणारे शिक्षक त्याना कितीसे शिकविणार ? ते एम्. एला असताना, एका परिक्षकाने तर त्यांच्या पेपरवर स्पष्ट लिहिले, की " The examinee knows more than the examiner ". गुरुकडून अनुग्रह मिळण्याला प्रथम पात्रता पाहिजे. तो मिळाल्यावर त्याच्यावर निष्ठा ठेवून त्याचे नियमाने अनुष्ठान झाले पाहिजे. मग साधकाला ज्ञान प्राप्त होते. गुरुदेवांना ते प्राप्त झाले. म्हणून शालेय शिक्षण हे त्याना केवळ लौकीक दृष्टया डिग्री घेण्यासाठीच करावे लागले असे म्हणणे वावगे होणार नाही.

शिक्षणानंतर नोकरी धरतानाही त्यानी आपली साधना चालू राहील, तीत अडथळा येणार नाही अशीच नोकरी करायची व तशी मिळाली नाहीतर पोटा पाण्याचा भार परमेश्वरावरच टाकायचा अशी त्यांच्या मनाची तयारी होती. याचा अर्थ त्यांचे ध्येय आणि जीवनाची

वाटचाल निश्चित अशी ठरलेली होती. म्हणूनच त्यानी लोकमान्य टिळकासारख्या महान् ग्रहस्थानी राजकारणांत येण्याविषयी आग्रह करुनही ते तिकडे गेले नाहीत. आणि याच कारणास्तव डे. ए. सोसायटीत कांही काळ नोकरी करुन त्यानी राजीनामाही देवून टाकला. अर्थिक अडचणी सोसल्या. शेवटी अलाहाबाद युनिव्हर्सिटीने त्याना मानाने बोलावून घेवून शेवटीपर्यंत त्याना ठेवून घेतले. एवढेच नव्हे, तर त्याना तेथील व्हाईस चान्सलरही केले. "निस्पृहस्य तृणम् जगत्" अशो त्यांची वृत्ती जन्मभर टिकून राहिली. मग दारिद्र्य येवो, उपेक्षा होवो, अगर मान मरातब मिळो. त्यांच्या स्वभावावर कांहीही परिणाम झाला नाही. संत ही सार्थ पदवी त्याना लागू आहे. कारण लौकीक दृष्टया सामान्य माणसे ज्याला सुख म्हणतात ते प्रापंचिक असो अगर शारिरीक सूख असो, त्याना मिळालेच नाही, त्याची त्यानी अपेक्षाच केली नाही. हे त्यांचे चरित्र वाचून समजून येते. संताची ती कसोटीच आहे. ती परीक्षा या जन्मात त्याना पास व्हावीच लागते. ते लोखंडांचे चणे पचवावे लागतात, तेव्हांच संत ही पदवी मिळते. गुरुदेवांची दोन लग्ने झाली, एक मुलगा अल्पायु जन्माला आला. प्रकृतीच्या कटकटीमुळे खाणेपिणेही त्याना पोटभर करता येत नव्हते. कित्येक दिवस ते केवळ चहावरच आपली भूक भागवीत. अशी सर्व बाजूनी त्यानी परिक्षा दिली आणि ते पास झाले.

## गुरुदेवांचे वाङ्मय :

पुर्वीच्या अनेक संताप्रमाणे गुरुदेवानी उपासना ग्रंथ किंवा काव्ये लिहिली नाहीत. त्यांचे सर्व वाङ्मय बुद्धिवादी आहे. अधश्रद्धा, कर्मकांड या गोष्टी त्यांच्या संप्रदायात नाहीतच. नेम, आरती आणि दासबोधवाचन हीच महत्वाची साधना त्यानी सर्वांना सांगितली. पूजाअर्चा, नैवेद्य, अभिषेक अशा सेवाना इथे फारसे महत्व नाही. हे सर्व कर्मकांडच. त्यानी संत तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ, कबीर यांच्या ग्रंथावर भाष्ये लिहिलीच. शिवाय गीता, वेद याबरही लिहिले. ते तत्वज्ञानाचे प्रोफेसर होते. त्यामुळे त्यांची वृत्ती शोधक होती; सत्यासत्य पडताळून पाहाण्याची

होती. आणि त्याप्रमाणे आचरण करण्यावर त्यांचा भर होता. म्हणून एका ठिकाणी माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् म्हणाले कीं " डॉ. रानडे हे तत्त्वज्ञान जगतात आणि आम्ही केवळ अभ्यास करतो".

## ऋद्धीसिद्धी :

मानवी जीवनांत आचरणालाच महत्व फार आहे. केवळ सत्य वचन, सदाचरण, आणि ईश्वरचिंतन एवढ्यानें सुद्धा मनुष्याला ऋद्धीसिद्धी प्राप्त होतात. सिद्धी मिळाल्या कीं साधकाला अहंकार होतो आणि त्याच्या हातून चुका घडू लागतात आणि पुन्हा तो खाली येतो. गुरुदेवाना ऋद्धीसिद्धी प्राप्त झाल्या होत्या; पण त्यानी त्यांच्याकडे कटाक्षाने पाठ फिरविली परंतु त्यांच्याकडून कांही चमत्कार सहज रीतीने घडलेले आहेत. शिवाय त्यांच्या शद्वाने कित्येकजण संकटमुक्त आणि चिंतामुक्त झाले आहेत, नाही असे नाही. संत स्वत चमत्कार करीत नाहीत. ईश्वर त्यांच्यासाठी ते घडवून आणतो. असे कांही चमत्कार त्यांच्या शिष्यानी अनेक पुस्तकांत नमूद केले आहेत.

१) निवांत स्थळी नेमास वसता यावे म्हणून श्री गुरुदेवानीं निंबाळास आपल्या घराजवळच दोन खड्डे खणले होते. एक स्वत: नेमास बसण्यासाठी व दुसरा इतर लोकासाठी. तेथे ते नेमाला वसत. तो खड्डा सुमारे दीड पुरुष होता. त्यात एकदा ते धोतराची घडी घालून त्यावर नेमाला वसले. वरच्या बाजूस गडी बसला होता. दीड तास नेम करुन ते उठून घराकडे गेले. नंतर गड्याने खड्ड्यातील धोतराची घडी उचलली तेव्हां तिच्याखाली सर्प बसलेला होता.

२) श्रीमंत बाळासाहेब औंधकर यांच्या वडिलांच्या पुण्यतिथीच्या उत्सवासाठी श्री गुरुदेव औंधास गेले. तेथे पोहोंचताच, 'पाहुणे कोण आले आहेत' हा प्रश्न त्यानी विचारला. ते एक अमेरिकन मिशनरी होते. त्याना भेटण्यास ते गेले. तेथून परत आल्यावर ते मिशनरी येणार ही पूर्व सूचना आपणास मिळाली होती, असे त्यानी सांगितले. याबाबत ते म्हणाले कीं "नामस्मरण पुष्कळ झाले म्हणजे

अशा गोष्टी घडतात. सिद्धी सारखा हा प्रकार आहे. तो परमार्थाला घातक आहे " " These are pitfalls ".

३) १९४१ मध्ये एका साधकाच्या पत्नी क्षयाने आजारीं होत्या. त्या साधकाजवळ श्री बाबासाहेब लिमये व शंकरराव मोकाशी भेटावयास गेले व तेथे वसले. इतक्यात तेथे बाबासाहेवाना गुरुदेवांची मुर्ती दिसू लागली. ती जवळ जवळ अर्धातास होती. लगेच बावा-साहेवानी कापूर लावला आणि नमस्कार केला. त्यावेळी गुरुदेव अलाहावादला होते. पुढे बावासाहेवानी ही गोष्ट गुरुदेवाना सांगितली तेव्हां त्यानी आकाशापुढे पाहून नमस्कार केला आणि म्हणाले यांत माझा कांही संबंध नाही. तुमची परमेश्वरावर निष्ठा आहे त्या पुण्याचे हे फळ आहे. आणि पुढे म्हणाले, समर्थ रामदासानी म्हटले आहे, "संत चमत्कार करीत नाहीत ते देवाच्या कृपेने होतात. कारण " ते पुण्यमार्गे गेले म्हणोनिया".

४) डेअरीचा धंदा करणाऱ्या एका साधकाला १५०० रुपये कर्ज झाले होते. एकदा ते निंबाळ आश्रमांत वरील कारणाने चिंताग्रस्त वसले होते. तेव्हां श्री गुरुदेवानी चिंतेचे कारण विचारले आणि म्हणाले "चिंता करु नको जा". त्यानंतर त्यांचा धंदा वाढला, कर्ज फिटले. हा वाणीचा प्रताप.

गुरुदेवानी आशिर्वाद देवून व कृपा दृष्टीने अनेक साधकांची सकटे दूर केली आहेत. " कृपादृष्टी " म्हणजे काय हे कित्येक साधकांच्या अनुभवाला आले आहे. कृपादृष्टी हा कल्पनाविलास नाही वा अधविश्वास नाही. याचा अनुभव डॉ करमकर सारख्या नामांकित डॉक्टरानीही आपले वडिलांचे बावतीत घतला आहे.

चमत्कार करतो तोच साधू असे मात्र समजू नये. पुण्यवंताचा आशिर्वाद मिळालेवर किंवा कांही साधना करूनही चमत्कार करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. पण चमत्काराचा उपयोग जेव्हां स्वतःचा मोठेपणा वाढविण्यास केला जातो तेव्हां त्याला बाजारी स्वरुप येते. खरे संत

त्याच्या मागे लागत नाहीत. पण निष्ठावंत भक्ताच्या संकटाविषयी कळवळा येवून संत जे सहज बोलतात त्यामुळे भक्तांचे हित होते. पण अशावेळी त्या संताना, आपण बोलतो व घडते ही भावनाही तेव्हां असत नाही. प्रत्येक गोष्ट ईश्वरी इच्छेने घडते अशीच त्यांची मनोमन खात्री असते.

## गुरुदेवांचे उद्बोधक विचार

१) मनुष्यास कांहीतरी ध्येय असावे मग कोणाचे ध्येय विद्या संपादन करणे असेल, कोणाचे द्रव्य प्राप्ती असेल, कोणाचे उद्योग अगर नोकरी असेल -अशी अनेक ध्येये असू शकतात. पण ती नाशवंत असतात. खरे ध्येय एकच 'भगवंताची प्राप्ती". त्याची प्राप्ती करुन घेण्यास अनेक अडचणी येतील, त्याची कदर करू नये. उदाहरणार्थ, तुकाराम यांचा प्रपंच शून्य होता. घरात दारिद्र्य. समर्थ ब्रम्हचारी. एकनाथ प्रपंच-परमार्थ सुस्थिती. तरी त्या सर्वांचे ध्येय एकच, ते म्हणजे परमेश्वर प्राप्ती हेच होते. त्यावर त्यांचा भर होता".

२) स्वरुपी राहाणे हा स्वधर्म – नामस्मरण करणे हा खरा धर्म, इतर धार्मिक गोष्टी कांहीही कामाच्या नाहीत. "नाम फुकाचे फुकाचे" असा अभंग आहे; पण नाम फुकाचे नाही.

३) प्रयत्न प्रारब्ध दोन्ही सिद्धांत खोटे, देव कर्ता हेच खरे. गुरुदेव एकदा म्हणाले, प्रारब्धही कांही करु शकत नाही, व मनुष्याचा प्रयत्नही कांही करु शकत नाही. सर्व कर्तृत्व ईश्वराकडे आहे. त्याच्या इच्छेशिवाय कांहीही हालत नाही. ईश्वराच्या इच्छेने जे घडते, त्याच दिशेने योगायोगाने आपला प्रयत्न झाला, तर प्रयत्नाला यश आले असे आपण म्हणतो नाहीतर प्रारब्धावर ती घटना टाकतो. हे दोन्हीही भ्रमच आहेत. ईश्वरच सर्व कार्य करतो. या सिद्धांतावरूनच, मनुष्याचे एकमेव कर्तव्य म्हणजे स्वतःची अशी वेगळी इच्छा न ठेवता, ती देवाच्या ईच्छेशी एकरूप करावी, हेच उरते. त्यानें निमित्तमात्र व्हावें.

४) आचरणाचे वळ देवाच्या वळाहून श्रेष्ठ: "आपले आचरण शुद्ध असले तर ब्रम्हा –विष्णू–महेशही आपल्याला मारू शकणार नाहीत. आणि वाईट असेल तर देवही आपल्याला तारू शकणार नाहीत". सर्व साधना आचरण शुद्धीसाठीच आहेत. साधनेने आचरण–शुद्धी झाली नाही तर ती साधना फुकट गेली असे समजावे.

५) स्वरुप संप्रदाय: आपला संप्रदाय हा " स्वरूप संप्रदाय " आहे असे गुरुदेव सांगत, नामस्मरणाच्या साधनानें परमेश्वराच्या स्वरुपाचा, आत्मस्वरुपाचा साक्षात्कार प्राप्त करुन घेणे हे ध्येय मानणारा हा संप्रदाय आहे. समर्थ म्हणतात त्याप्रमाणे –

**सकळ धर्मामधे धर्म । स्वरुपी राहाणे हा स्वधर्म ।।**

६) विश्वरूप दर्शन– यशोदेला विश्वरूप दर्शन झालें याविषयी गुरुदेव म्हणाले: "हे दर्शन होण्यांत यशोदेचे मोठेपण आहे. कृष्णाने ते दाखविले यांत त्याचे मोठेपण नाही. कारण ते दिसू शकेल असा अधिकार ज्याला आहे त्या साधकाला विश्वरूप सदा उघडे आहेच.

७) पूर्णत्वाकडे अखंड वाटचाल – मार्गदर्शनासाठी ईश्वराची आराधना व प्रार्थना सतत केली पाहिजे ती थांवता कामा नये. कारण देह असे पर्यंत कोठेच पूर्णता धरुन चालता येत नाही. थोडीतरी अपूर्णता राहातेच. म्हणून ईश्वराचे मार्गदर्शन अवश्य आहे.

८) एकदा ह. भ. प. सोनोपंत दांडेकर निंवाळास आले असताना " आरक्त परकूट मध्ये शुभ्रवर्ण " हा अभंग त्यांच्यासमोर गुरुदेवानी म्हणविला आणि " त्यावद्दल आपल्याला काय वाटते ?" असे विचारले. " वारकरी संप्रदायामध्ये हा अभंग प्रक्षिप्त मानतात, " असे ह. भ. प. सोनोपंतानी सांगितले. यावर " हो का ? " एवढेच गुरुदेव म्हणाले. " अभंग कोणाचा का असेना, साक्षात्कारी पुरुषाच्या अनुभवाचे त्यात वर्णन आहे यात मात्र शंका नाही. " असे ही गुरुदेव म्हणाले.

९) विश्वांतील सर्व सत्ता ईश्वराची — ज्योतिष, पापग्रहांची शान्ती वगैरे विषय निघाला असताना गुरुदेव म्हणाले, " देव म्हणजे व्हॉईसरॉय, ग्रह म्हणजे मामलेदार–फौजदार. व्हॉईसरॉय हातात आल्यावर मामलेदार फौजदारांचा वशिला कशाला?

१०) देव भक्तांचा कैवारी : १९४७ सालची गोष्ट. पंजाबातील हत्याकांडाच्या बातम्यामुळे मन अस्वस्थ होऊन एका साधकाला नेमात त्रास होत असे. यासंबंधी गुरुदेवाना विचारले असताना ते म्हणाले, "ते खरे आहे; पण त्यास उपाय म्हणजे देवाचीच प्रार्थना करणे होय. तेव्हां हे जाणून नेमच घट्ट करावा."

## गुरुदेव वचनामृत

१) केवळ नेम करुन उपयोग नाही. अंतःकरणांत ईश्वरासाठी तळमळ निर्माण झाली पाहिजे.

२) नामस्मरण करणे हा खरा धर्म. इतर धार्मिक गोष्टी कांही कामाच्या नाहीत.

३) देवाच्या स्वरुपाहून त्याचे नाम श्रेष्ठ. पण नामाहून भाव श्रेष्ठ.

४) दैव म्हणजे देवाची कृपा.

५) देह हीच आत्म्याची छाया. त्या छायेचे आणखी चित्र कसले काढायचे ?

६) केवळ कॉस्मॉपोलिटन होऊन चालणार नाही. थिऑ–पोलिटन झाले पाहिजे.

७) कॉलेज सारख्या शिक्षण संस्थेचे यश हीन प्रतीचे उच्च शिक्षण स्वस्त किंवा सर्व सुलभ करण्यांत नसून उच्च शिक्षण सर्वोत्कृष्ट कसे होईल, हे पाहाण्यात आहे.

८) प्रोफेसर म्हटल्याने कोणी प्रोफेसर होत नाही. तसेच प्रोफेसर हा हुद्दा देवून भागत नाही. तो हुद्दा मिळवावा लागतो.

९) साधक :– पिंजऱ्यातील पोपटास दार सताड उघडे ठेवले असताही वाहेर पडून स्वतंत्र होण्याची इच्छा होत नाही. त्याप्रमाणेच आपले आहे. नामस्मरण करुन मुक्त होण्यापेक्षा, मायेत, दुःखांत राहाणे यांतच आपण सूख मानतो.

१०) साधकानी कल्पित कादंवरी, कल्पित कथा वाचू नयेत.

## नेम, (साधन किंवा नामस्मरण)

बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त । तया सुखा अंतपार नाही ।।
येऊनि अंतरी राहील गोपाळ । सायासाचे फळ बैसलीया ।।
रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारी वेळोवेळा ।।
तुका म्हणें ऐसे देईन मी दिव्य । जरी होईल भाव एकविध ।।

वरील अभंगाला अनुसरून निंवरगी संप्रदायात नामस्मरण व मनाची एकाग्रता हीच श्रेष्ठ साधना आहे. त्या साधनेला नेम म्हणतात.

१) एकाच आसनावर वराच वेळ न हालता, न डुलता वसणे जरुर आहे. नेमांत झोप आल्यास हरकत नाही. पण नेमास वसणे जरुर आहे.

२) नेमाची वेळ शक्यतो ठरलेली असावी. प्रसंगी वेळ मिळेल तेव्हांही नेम करावा. कमीत कमी तीन तास नेम करावा.

३) संधीकालांत जो नेम करतो त्याचे आयुष्य व बळ वाढते.

४) रात्री नेमास वसले असताना पाठ केलेला अभंग व पद म्हणावे; वाचून म्हणू नये.

५) सर्वात श्रेष्ठ नेम म्हणजे सहा तास वसणे.

६) जेव्हां कांही ठराविक नेम करावयाचा असेल तेव्हां माळ वापरावी. श्वास ही मनाला वधन, दोरी आहे. नाम व रूप हीही दोरीच.

७) नेम करताना देवाची मूर्ती डोळचासमोर आणण्याची जरुरी नाही. नामस्मरण केले तर देवच आपोआप समोर येईल.

८) नामाचा जोर झाला म्हणजे नाद वाढतो.

९) सामुदाईक रीतीने कट्टाने नेम करावा.

१०) निंबरगी महाराज सांगत "देवाच्या इच्छेप्रमाणे होऊ दे" असा विचार करून नेमास बसावे. कारण देवाच्या इच्छेप्रमाणे घडणार हे ठरलेले आहे.

११) भाव–भक्ती अतःकरणांत उत्पन्न होणे कठीण आहे. तरी पण नेम करीत राहावा. ज्या नामाने प्रचिती येते तेच नाम खरे. प्रचिती येणें, वाढविणे हे सर्व देवाच्या कृपेवर अवलंबून आहे. पुष्कळ नामस्मरण करणे एवढेच आपले काम. चांगला नेम होणेही देवाच्या कृपेवर अवलंबून आहे.

१२) नामस्मरण करीत राहावे. वसंत ऋतु आल्यावर फळ येते. साधन दीर्घ काळ करावे. प्रचिती वाढणे आपल्या ताब्यात नाही.

१३) साधनाकडे लक्ष नसते म्हणून फळास विलंब लागतो. सदासर्वदा नद्यास पूर येत नाही. नेमास पूर आला असताना प्रचीती येते. तोच वसंत ऋतू.

१४) तेरा कोटी म्हणजे "तेरा" "तेरा" ( तुझा तुझा ) असे जेव्हां अन्तःकरणात होईल तेव्हां देव दिसतो.

१५) दुःखात मन शुद्ध होते. ते विषयचिंतन करीत नाही. म्हणून परमार्थ मार्गीयानी देहाच्या सुखदुःखाची चिंता करु नये.

## गुरुदेवांचे तत्त्वज्ञान

गुरुदेव तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर होते. पण कट्टे ईश्वरनिष्ठ होते. त्यांचा परमार्थ हा रामदासाप्रमाणे "रोकडा परमार्थ" होता.

परमार्थाचे फळ पुढील जन्मात मिळणार असेल तर त्याच्याशी आम्हाला कर्तव्य नाही, असे ते स्पष्ट म्हणत." मुखी नाम, हाती मोक्ष". ईशसेवा हीच जनसेवा असाही त्यांचा सिद्धांत होता. सर्व संत हेच करतात. तेच मानव जातीची इतर समाजसेवकापेक्षा जास्त सेवा करतात असे ते म्हणत. स्वतः तरणे व दुसऱ्यास तारणें, हेच संताचे ध्येय. आजवर होऊन गेलेल्या संतानी हेच केले.

"अवघाची संसार सुखाचा करीन" ही ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा होती व त्याप्रमाणे त्यानी जगाला आनंदाचे आवार घालण्याचा प्रयत्न केला. तुकाराम तर सांगतात की, "मागें जन्मोजन्मीं आपण हेंच करीत आलों ते म्हणजे दुःखितांचे दुःख निवारण". रामदासानीही "अवघेचि सुखी असावे". या एकाच हेतूने रामकथा ब्रह्मांड भेदून पलीकडे नेण्याचा उद्योग केला. तात्पर्य, संत जगासाठी, जगाच्या सुखासाठीच जगतात. त्यानी राष्ट्रासाठी, समाजासाठी काय केले हा प्रश्नच खरोखर अप्रस्तूत आहे असे गुरुदेव रानडे म्हणत.

मनुष्याला क्षणाक्षणाला देवाची आठवण करून देणे ही मानव जातीची सर्वश्रेष्ठ सेवा असून सर्व संत ती करीत आले आहेत. ईश्वर–सेवा हीच खरी जनसेवा. जगाला भक्तीच्या वाटेस लावणे यापरता श्रेष्ठ कर्मयोग नाही असे ते सांगत.

नामस्मरणावर त्यांची पराकाष्टेची श्रद्धा होती. ते म्हणत, "नामस्मरणाने देवाची कृपा उत्पन्न होईल. ती कोठे, कोणाच्या आणि कशी प्रत्ययाला येईल ते कसे सांगावे?"

## गुरुदेवांची गुरुभक्ती

रामभाऊनी १९०१ साली श्री भाऊसाहेब महाराजाकडून अनुग्रह घेतला. तेव्हांपासून देह ठेवीपर्यंत म्हणजे १९५७ सालापर्यंत सतत ५६ वर्षे गुरुसेवेचे वृत अखंड आणि एकनिष्ठेने आचरलें. अगदी बालवयात त्यानी गुरु केल्यामुळे त्यांची गुरुभक्ती सुरवातीला सकाम होती. तसेच ती तितकीशी डोळसही नव्हती. असणेही शक्य नव्हते.

पण साधना करण्यात मात्र त्यानी हयगय केली नाही. त्यामुळे त्याना जसजसा अनुभव येवू लागला तसतशी श्रद्धा वाढत गेली. आणि वाढता वाढता "गुरु: साक्षात् परब्रम्ह" या अनुभवास ते जाऊन पोचले.

परमार्थात सद्गुरुची अवश्यकता आहे पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे गुरुदेवाना वयाच्या पंधराव्या वर्षीच अत्यंत थोर सद्गुरु लाभले आणि त्यानंतर दहा वर्षानीच त्याना आपल्या गुरुची थोर योग्यता समजली, किंवा अनुभवाला आली. ते अधश्रद्धाळू नव्हते. सर्व संतानी एकमुखानी म्हटले आहे की "गुरुवांचून आत्मज्ञान नाही". प्रो. रानडे याच मार्गाने गेल्याने त्यांचे अनुभव वाचताना उद्बोधक वाटतील. एका व्याख्यानांत ते म्हणतात:– "सद्गुरु शिष्यासाठी काय करतात? देव आणि भक्त यांची गांठ घालून देतात आणि आपण दूर राहातात." सतारीची एक तार छेडली तर दुसऱ्या तारा न छेडता आपोआप वाजू लागतात. त्याच– प्रमाणें आत्मानुभुतीचा दिव्य झणत्कार त्यांच्या ठिकाणीं झणकत असतो. आणि त्यांच्या संगतीत येणारानाही तो प्राप्त होतो. पण अशा मार्गदर्शक गुरु कसा भेटणार ? आजकाल जगांत भक्तीचा आणि गुरुत्वाचा बाजार चालू आहे हे आपण पाहतो आहोच. पण रामदासांच्या दासबोधाचा आधार घेऊन गुरुदेव सांगतात, "गुरुच्या अंगीं असणारे कांहीं नैतिक, शारिरीक, पारमार्थिक व सामाजिक विशेष हे ते निकष होत". तसेच "अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान व बाह्यतः निष्ठेंचे भजन, निश्चयाचे समाधान, स्वरुपस्थिती, प्रबल वैराग्य, उदासवृत्ती, निर्मल आचार व अखंड परमार्थविवरण अशी सद्गुरुची लक्षणे असतात." ते पुढे म्हणतात. "गुरुचा देह म्हणजे गुरु नव्हे, तर त्याचे गुप्त रूप हा खरा गुरु. तो गुप्तरुप असतो व या गुप्तरुपाचा अनुभव आपल्या शिष्यास आणवून देतो. गुरुचे गुरुत्व त्याच्या शरीरांत नसून त्याच्या परमार्थामध्ये आहे.

देहातीत गुरुची ही कल्पना एकदा कळली म्हणजे गुरुभक्ती विषयींचे सुशिक्षित समाजांतील गैरसमज दूर होतील. गुरुची सेवा म्हणजे गुरुच्या जड देहाची सेवा नव्हे. नेम किंवा साधन हे या

गुरुभक्तीचे मुख्य अधिष्ठान असून इतर अंगाना गौण स्थान आहे. तुकाराम महाराज म्हणत, "आम्ही तेणे सुखी। म्हणा विठ्ठल, विठ्ठल मुखी ।।".

**नामस्मरण :**

गुरुदेव सांगतात, नामस्मरणाने अंत:करणातील भाव निर्माण होतो. सतत नामस्मरण हा साधन मार्गाचा पाया आहे. सर्व संतानी नामस्मरणाची महती गाईलेली आहे नाम श्रेष्ठ का ? ते देवाच्या रुपाचा अनुभव आणून देते म्हणून. मनाची एकाग्रता घडवून आणण्याचे तेच एक साधन आहे. गुरुने दिलेल्या नामांला 'सबीज' नाम म्हणतात. याच बीजाच्या योगाने साधकाच्या पारमार्थिक अनुभवाच्या वृक्षात रुपांतर होते. सद्‌गुरु हा आत्मसाक्षात्कार होवून ब्रह्मरुप झालेला असतो. म्हणून त्याने दिलेल्या नामांत एक दिव्य शक्ती असते. ज्यात देवाचे बीज आहे, असे हे दिव्य किंवा सबीज नाम पूर्व जन्मीचें काही सुकृत पदरी असेल तरच मिळणार आणि मिळाले तरी साधकाच्या ठिकाणी योग्यता असल्यावाचून त्याचा उपयोग होणार नाही. कारण बीज हाती आले पण ते पेरुन त्याला खतपाणी घातले नाही तर ते फुकटच जाणार.

सद्‌गुरुपासून मिळणाऱ्या या सबीज नामाचें अखंड व सतत स्मरण करणें हे गुरुदेव रानडे यांच्या परमार्थं मार्गातील मुख्य साधन होय.

"स्मरण म्हणजे स्मरणे किंवा आठवणें,, उच्चारण नव्हे. तो जप मनानेच केला पाहिजे. भाव त्यायोगेच निर्माण होईल. "नाम–स्मरण ही मनाची एकाग्रता साधण्याची क्रिया, पद्धती आहे. यामुळे दिवसातून जितका जास्त वेळ नेम घडेल तितका मनावर थोडाफार तावा आणता येईल. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

"तरी तूं गा ऐसें करी । यया आठां पाहारां माझारीं ।
मोटके निमिषभरीं । देतु जाय. ।।

मग जे जे कां निमिख । देखेल माझे सुख ।
तेतुले अरोचक ।विषयीं घेईल ।।

असो. साधकाचे जीवनांत नेम हा मुख्य. इतर गोष्टी दुय्यम हे ओळखून वागावे.

**साक्षात्कार–अनुभव :–**

इ स. १९१९ सालीं श्री गुरुदेवांची प्रकृति अतिशय विघडली. मातोश्री व पत्नी वारल्यामुळें, शुश्रुषा करणेस कोणीही नव्हते. म्हणून परमेश्वरावर सर्व भार टाकून, त्यानी आपला नेम वाढविला. आध्यात्मिक अनुभव वाढले. त्या अनुभवाबद्दल, त्यानींच लिहिलेला अभंग काय सांगतो ते पहा :

अनंतरूपी आत्मा बिंबविला डोळा । होतसे सोहळा आनंदाचा ।।
शेषाचे वेटाळें प्रकाश चांदण्याचा । दिसतसे साचा दृष्टीपुढे ।।
मोतियाचे जाळे शुद्धवत चुरा । शोभे जैसा हिरा चकचकीत ।।
चक्रामध्ये चक्र एक नीलवर्ण । गुरुकृपे जाण दिसतसे ।।

त्याचवर्षी श्री गुरुदेव आणि काका कारखानीस हे टांग्यातून आळंदीला चालले होते. टांग्यातून जाताना श्री गुरुदेवाना श्रीकृष्णाचें दर्शन सतत घडत होते. ज्ञानेश्वरांचा एक अभंग आहे :

तुझिये निढळी कोटी चंद्र प्रकाशे । कमलनयन हास्यवदन भासे ।।
कृष्णा हाल कारे, बोल कारे । घडिये, घडिये, घडिये गुज
बोल कारे ।।
उभा राहोनिया कैसा हालवितो बाहो । बापरखुमादेवीवरू
विठ्ठल नाहो ।।

आळंदीला पोचेपर्यंत हा अनुभव त्याना येत होता. नंतर त्यांनी काका खारखानीस याना यावाबत सांगितले. श्री गुरुदेवांना हा अभंग त्यानंतर अत्यंत आवडू लागला.

अशाप्रकारे, नाद, स्पर्श, गंध वगैरेबद्दल अनुभव त्यांना येत असत. 'जेथें जाई तेथे तू माझा सांगाती। रखुमाईचे पती सोयरीया।' हा अनुभवही त्यांना पुष्कळदा आला होता. अमृतरसही मिळत होता.

## प्रसन्न व्यक्तिमत्व

भगवद्गीतेच्या १६ व्या अध्यायात दैवी संपत्तीचे गूण कोणते त्याचे वर्णन केलें आहे :

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्॥ १
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम्।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम्॥ २
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत॥ ३.

हे सर्व दैवी गुण एकाच ठिकाणीं पहावयाचे झालेस, श्री गुरुदेव रानडे यांचेकडे बोट दाखवावे लागेल. या दैवी गुणांचे ते माहेरघरच होते. १९४७ सालीं अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे नोकरीतून निवृत्त झालेवेळी प्रॉव्हिडंट फंड वगैरे मिळून युनिव्हर्सिटीनें श्री गुरुदेवाना सत्तर हजार रुपये अजमासे देणेंचे होते. दोन वर्षे होवून गेली, तरी पैसे मिळाले नाहींत. श्री गुरुदेव पैशाचे अडचणीत असताना हा विषय सहज बोलण्यामध्यें निघाला त्यावेळीं तेथें बॅरिस्टर अंकलीकरही होते. "पैसे देत नाहीत, तर कायदेशीर नोटीस देवून वसूल करुया" असें ते म्हणाले. श्री गुरुदेवानीं उत्तर दिले. "छे, छें, सध्या युनिव्हर्सिटीच पैशाचे अडचणींत आहे आणि अशा वेळीं नोटीस देवून युनिव्हर्सिटीचे मन दुखविणें, बरे नव्हे". किती थोर अहिंसा? मनाचा केवढा मोठेपणा?

रामदुर्ग एथे श्री गुरुदेवांची जमीन होती; कुळाकडे होती. मुंबई राज्यात 'कूळ' कायदा १९४७ साली लागू झालेवर, रामदुर्गचे मामलेदारनीं कायद्याप्रमाणे श्री गुरुदेवाना नोटीस दिली. गुरुदेवांची अशी कामें कै. बाबासाहेब संगोराम पहात असत. वकीलपत्र तयार करून,

त्यावर श्री गुरुदेवाना सही करणेस त्यानी सांगितले. गुरुदेवानी वकील-पत्र वाचलेवरोवर उद्‌गार काढले कीं, "मी कोणाचा प्रतिवादी नाही, 'आपोनंट' नाही. मी कोणाचा द्रोह करीत नाहीं. सर्व लोक मला सारखे आहेत". वकीलपत्रावर त्यानीं सही केली नाहीं. श्री बाबा-साहेबानीं मामलेदारना हकीगत समजून सांगितली; आणि जमीनीची जी किंमत त्यानी मंजूर केली तेवढी घेवून परत आले.

१९२४ साली डे ए. सोसायटीचा राजीनामा देवून, गुरूदेव निंबाळ येथे राहणेस गेले. १९२६ साली त्यांचा ग्रंथ Constructive Survey of upanishadic Philosophy प्रसिद्ध झाला. याचवेळी ते पैशाचे अडचणीत आले, म्हणून श्री बाळासाहेब देशपांडे या आपले मित्राना त्यानी पत्र लिहून भेटीस बोलाविले. श्री बाळासाहेब हे त्या वेळी बागलकोट एथे मामलेदार होते. घरचे श्रीमंत व मलिकवाड गावचे इनामदार. पत्र पोचलेवरोवर दुसरे दिवशी आपली व्यूक गाडी घेवून ते निंबाळास सकाळीच पोचले. गुरुदेवांचे कडून हकीगत समजले-वरोवर त्यानी खिशातून पाचशे रुपयांचा नोटा काढून गुरुदेवांचेपुढे ठेवून, उद्या बागलकोटला परत गेलेवरोवर आणखी पाचशे रुपये लावून देतो असे सांगितले श्री गुरुदेवांनी ती रक्कम घेणेचें नाकारले. माझा हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या दोनशे प्रति खपवून मला तीन हजार रुपये आणून द्या असे श्री गुरुदेवानीं त्याना सांगितले. श्री बाळासाहेबानी त्याप्रमाणे करणेचे कबूल करून ग्रंथ खपवून रक्कम गुरुदेवांचेकडे दिली.

श्री जॉर्ज बर्च नावाचे एक अमेरिकन प्राध्यापक श्री गुरुदेवांचे भेटीकरता निंबाळ एथे गेले होते. तेथे ते काही दिवस राहून परत गेले. श्री गुरुदेवांचे निर्याणानंतर, त्यानी आपले लेखांत श्री गुरुदेवांचे वर्णन खालील प्रमाणे केले आहे.

"प्रो. रानडे जसे असतील असे मला वाटले होते, त्याच्या सर्वस्वी विरुद्ध ते आहेत असे दिसून आले. त्यांची प्रकृती नाजूक व किडकिडीत होती. वाऱ्याचे झुळुकीनेही ते उडून जातील की काय असे

वाटले तरी त्यांचा आध्यात्मिक आणि बौद्धिक उत्साहच नव्हे तर शारिरीक उत्साह सुद्धा मोठा होता. त्यांचे भरभर चालणे जणू त्यांच्या आनंदी व्यक्तित्वाचे निदर्शक होते. भपकेबाजपणा अथवा दिखाऊपणा तेथे नावालाही नव्हता. भोवतालच्या साधकांना ते देवाप्रमाणे वाटत असले तरी त्यांची विनोदी वृत्ती कायम होती. ते बोलण्यात स्पष्ट होते...... ते अत्यंत नम्रपणे वागत असले तरी निवाळला येणाऱ्या व्यक्तीला गुरू कोण हे सहज ओळखता येत असे. त्यांची अध्यात्मिकता त्यांच्या प्रत्येक दृष्टिक्षेपातून, शब्दातून व कृतीतून व्यक्त होत असे. ते स्वभावताच संत असल्यामुळे आपण सत आहोत हे भासविण्याची गरज त्याना नव्हती.

" मला श्री रानडे यांच्या आध्यात्मिक आणि बौद्धिक साधनेबद्दल कौतुक वाटतेच. पण मला स्पष्ट आठवते ते त्यांचे प्रेमळ व्यक्तिमत्व. मला व इतर अनेकानाही ते असे एक मित्र होते की ज्याला कधीही विसरणे शक्य नाही त्यांच्या शिष्याना तर.ते फारच थोर वाटत. ते भारतातील एक श्रेष्ठ पुरुष होते. भारतात काय किंवा अन्य देशात काय विविध संशोधनांत गुंतलेले अनेक विद्वान आहेत. सत्याचा शोध घेणारी सखोल दृष्टी असलेले तत्त्वज्ञ आहेत. दिव्य अनुभव असलेले अनेक श्रेष्ठ अनुभावी आहेत. आपल्या शिष्याना स्फूर्ती देणारे अनेक श्रेष्ठ शिक्षक आहेत. ज्यांचे व्यक्तिमत्व तेजस्वी आहे असे महात्मे आहेत. परंतु हे सर्व गुण एकसमयावच्छेदेकरून ज्यांच्यांत आहेत असा माणूस विरळा. श्री रानडे अशा प्रकारचे होते. मनुष्य-स्वभाव कितो सुरेख असू शकतो याचं एक दुर्मिळ उदाहरण श्री रानडे होत."

डॉ. व्ही. के. गोकाक हे गुरुदेवांचेबद्दल म्हणतात " The frail body of Dr. Ranade houses a great soul. He was a great builder, teacher and scholar and a serene philosopher and mystic. For several years he hardly lived on any other nourishment but tea. But he needed no other food.

For he on honeydew hath fed
and drunk the milk of paradise "

(मराठी भथितार्थ : डॉ. रानडे यांच्या कृश देहामधे परमात्मा बसत होता. ते एक थोर रचनाकार, शिक्षक आणि बुद्धिमंत होते मोठ तत्वज्ञानी, साक्षात्कारी होते. कित्येक वर्षे चहाशिवाय दुसरे अन्न ते घेत नसत. अमृतरस पिणाऱ्यास अन्नाची जरुरी काय ? )

डॉ. राजेंद्रप्रसाद, राष्ट्रपती (१९५४) म्हणतात. – प्रो रानडे यांचा निरनिराळ्या भारतीय भाषांतील "संतवानी"चा अभ्यास अनेक वर्षांचा असून पूर्वीपासून चालत आलेले हें तत्त्वज्ञान त्यांच्या ठिकाणी मूर्तिमंत स्वरूपात वास करीत आहे.

१९५६ साली श्री गुरुदेवांचा अमृत मोहोत्सव साजरा झाला. त्यानिमित्त त्यांच्या तैल चित्राचे अनावरण कै. गंगाधरराव देशपांडे यांचे हस्ते झाले, तेव्हा ते म्हणाले"आज माझ्या वयाला ८५ वर्षे पूर्ण झाली आहेत. गेल्या पन्नास वर्षांतील राजकारणी आयुष्यातील अनेक घडामोडी मी अनुभवल्या मी स्वत: अनेक चळवळी केल्या. अनेकदा तुरुंगात गेलो. आता देश स्वतंत्र झाल्याने माझें राजकीय ध्येय सफल झाले आहे. पण मला आध्यात्मिक समाधान नव्हते. ते मला रामभाऊंच्या एका भेटीत आणि जो थोडा सहवास लाभला त्यांत मिळाले. तीन वर्षापूर्वी रामभाऊंच्या अखेरच्या टप्यात माझा रामभाऊशी संबंध आला हे मी माझें भाग्य समजतो. त्यांच्यामुळें मला सात्विक समाधान मिळाले. आता मला समाधानाने मृत्यू येईल.

## श्रीमहाराजांची भविष्यवाणी

सन १९०७ साली श्री गुरुदेव रामभाऊ रानडे हिंचगेरीस आपल्या सद्‌गुरुंच्या सहवासात होते. त्यावेळी प. पू. श्री निंबरगी महाराजांचे नातू श्री नागापा आण्णा हे सद्‌गुरु भाऊसाहेब महाराजांना भेटावयास आले होते. बोलण्याच्या ओघात श्री भाऊसाहेब महाराज

श्री नागाव्या आण्णा याना गुरुदेव रानडे यांचेकडे बोट दाखवून म्हणाले, "हा राम तुमच्या आजोबांची किर्ती साता समुद्रापलीकडे नेईल बरं का ?"

ही सद्गुरुची वाणी पुढे अक्षरशः खरी झाली. सन १९२६ साली A Constructive Survey of Upanishadic Philosophy हा उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाचे समालोचन करणारा, गुरुदेवानी लिहिलेला ग्रंथ प्रसिद्ध झाला आणि या ग्रंथामुळे आणि इतर अशाच ग्रंथामुळे श्री गुरुदेव रानडे यांचे नांव एक थोर तत्त्वज्ञानवेत्ता म्हणून जगप्रसिद्ध झाले. त्याना जागतिक किर्ती मिळाली. एवढेच नव्हे, परमार्थीयाना मार्गदर्शन करणारा, साक्षात्काराचा महाभाष्यकार आणि या विसाव्या शतकातील एक महान् थोर साक्षात्कारी संत म्हणून त्यांची कीर्ती जगभर पसरली आहे.

## संस्था

धर्म व तत्त्वज्ञान या विषयांचा सांगोपांग अभ्यास करणेकरता तारीख १-८-१९२४ रोजी श्री गुरुदेवांनी "अकॅडेमी ऑफ फिलॉसॉफी अँड रिलिजन" म्हणून एक संस्था स्थापन केली. ते या संस्थेचे डायरेक्टर झाले आणि प्रो. पी. के गोडे व प्रो. एन्. जी. दामले हे सेक्रेटरी होते. या संस्थेमार्फत "भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास" म्हणून काही ग्रथ प्रसिद्ध करणेचा विचार होता. A Constructive Survey of Upanishadic Philosophy, हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. आणखी काही ग्रंथ प्रसिद्ध झाले आणि संस्था बंद झाली.

१९५२ सालामध्ये, याच नावाची संस्था कंपेरेटिव्ह हा शब्द जास्त घालून म्हणजे अकॅडेमी ऑफ कंपेरेटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन असे नामाभिधान ठेवून, बेळगांव येथें श्री गुरुदेवानीं स्थापन केली. विश्वस्तनिधी म्हणून ही संस्था नोंद केली. ही संस्था कार्यरत असून व्याख्यानें, परिसंवाद घडवून आणले जातात. या संस्थेने काही ग्रंथही प्रसिद्ध केले आहेत:

ही संस्था स्थापन करतेवेळी श्री गुरुदेवानी उद्गार काढले की, या संस्थेमार्फत आपले तत्वज्ञान जगभर प्रसरित होईल. सद्गुरूंची वाणी खरी ठरणारच.

## असे होते गुरुदेव

श्री गुरुदेवाना जन्मभर दुखण्याने सोडले नाही: तरी त्यांचे साधन चोवीस तास चाले. आपल्या प्रकृतीची अगर वेळप्रसंगी निर्माण झालेल्या अर्थिक अगर इतर अडचणींची यत्किंचितही वाच्यता त्यानी केली नाही. झोप कमी. वाचन, लेखन, संभाषण सतत चालू असे. त्याना आयुष्यात एकच दुःख जाणवले ते म्हणजे आपले सद्गुरुंच्या निर्याणाचे.

श्री महाराजांच्या फोटोपुढील अंगारा लावून घेणे व तेथे कापूर, उदवत्ती लावणे हे त्यांचे आवडीचे काम. घरातून बाहेर जाताना किंवा परगावाहून आल्यावरोबर प्रथम हे काम ते करीत.

शेवटी शेवटी ते चहावरच राहात. थोडाथोडा दिवसातून चारपाच वेळा चहा घेत.

गुरुदेव उपनिषत्कालीन सत्पुरुष होते. ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजाप्रमाणे थोर संत आणि साक्षात्कारी पुरुष होते. पारमार्थिक अनुभवाच्या अगदी उच्च शिखरावर पोहोचून. तो परमार्थ मुक्त हस्ताने दान करीत होते.

"आपण तरेल नव्हे ते नवल. ।
कुळे उद्धरील सर्वांची तो "।।

आपण तरून इतरानीही तरावे असे त्याना वाटे.

याप्रमाणे आपले सारे जीवन भक्तीला, परमार्थाला वाहून त्यातच कृतकृत्य होऊन गुरुदेवानी जगाचा शांतपणे निरोप घेतला (६ जून १९५७). जन्माला आला तो जाणारच. संत हे देहरुपाने

जातात पण आत्मरुपाने अमर असतात. भारत ही संतांची भूमी आहे. ज्ञानेश्वरानी " ईश्वरनिष्ठांची मांदियाळी" जगावर निर्माण होऊ दे; आणि जगावर ज्ञानाचा प्रकाश सतत पाडत राहू दे, असे विश्वात्मक देवाजवळ मागणे मागितले. ते मागणे विश्वात्मदेवाने " हा होईल दान पसावो " म्हणून आशिर्वाद दिला. तो आशिर्वाद खरा होणारच. त्याला अनुसरुन महाराष्ट्राला एकनाथ, रामदास, तुकाराम असे एक नव्हे, दोन नव्हे, शेकडो संतांचे वरदान लाभले आहे. त्याचप्रमाणे निंबरगी संप्रदायातील हे तीन श्रेष्ठ संत म्हणजे श्री भाऊसाहेब महाराज, श्री अंबूराव महाराज आणि श्री गुरुदेव रानडे.

" महाजनो येन गतस्य पंथः " महाजन म्हणजेच संत. ते ज्या मार्गाने गेले व त्यानी जो मार्ग दाखविला त्या मार्गाने जाण्यांतच जीवनाचे सार्थक आहे.

ॐ शांतिः शांतिः शांतिः

## संदर्भ ग्रंथ


१) श्री गुरुदेव रानडे : प्रा भालचंद्र मोडक व सौ वसुधा मोडक


२) प्रा. रा द. रानडे – चरित्र आणि तत्वज्ञान : शं. गो. तुळपुळे

3) Silver Jubilee Souvenir, Vol I–Ed. K D. Sangoram and M. S Deshpande

4) Pathway to God – Quarterly journal

५) पुण्यस्मृती – कृ. दा. सगोराम

## निंबरगी सांप्रदायाचे साक्षात्कारी संत



वरील, श्री निंबरगी महाराजांची समाधी ( फोटो मिळत नाही )
डावी ते उजवी : श्री अंबुरावमहाराज : श्री भाऊसाहेबमहाराज : श्री गुरुदेव रानडे :